# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

# पिंपरी – ४११ ०१८

# क्रीडा विभाग

कलम ४ (१) (ब) (xii) नमुना अ

**म.न.पा. परिसरातील विद्यार्थी खेळाडूंसाठी शालेय क्रीडा शिष्यवृत्ती व खेळाडू दत्तक योजना**

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८.

## क्रीडा विभाग

**म.न.पा. परिसरातील विद्यार्थी खेळाडूंसाठी शालेय क्रीडा शिष्यवृत्ती योजना**

मा. महापालिका सभा ठराव क्र.९९१ दि.२०/०९/२०१० चे अधिन राहून, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी खेळाडूंना प्रोस्ताहन मिळून म.न.पा. परिसरातील जास्तीत जास्त राज्य व राष्ट्रीय स्तरावर खेळाडू तयार होण्याच्या दृष्टीने म.न.पा.च्या वतीने दरवर्षी क्रीडा शिष्यवृत्ती देणेत येते. **सन – २००३-०४ ते २००९-१० या आर्थिक वर्षात प्रती खेळाडूं अनुक्रमे र.रू.१,८००/-, र.रू.३,०००/- व सन २०१०-११ या आर्थिक वर्षापासून प्रति खेळाडूं अनुक्रमे र.रू.३,०००/- व र.रू.५,०००/- व सन २०१८-१९ पासून र.रू.३,३००/- व र.रू.५,५००/- अदा करण्यात येते.**

**खालील प्रमाणे क्रीडा शिष्यवृत्ती अदा करण्यात आलेली आहे.**

| अ.क्र | क्रीडा शिष्यवृत्ती वर्ष | आर्थिक वर्ष | राज्यस्तर विद्यार्थी संख्या/वाटप शिष्यवृत्ती र.रू. (लाखात) | राष्ट्रीयस्तर विद्यार्थी संख्या/वाटप शिष्यवृत्ती र.रू. (लाखात) | आंतरविद्यापीठ स्तर विद्यार्थी संख्या/वाटप शिष्यवृत्ती र.रू. (लाखात) | एकूण विद्यार्थी संख्या/वाटप शिष्यवृत्ती र.रू (लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१७-१८ | २०१८-१९ | ६८/२.२४४ | ९/०.२९७ | ६७/३.६८५ | १४४/६.२२६ |
| २ | २०१८-१९ | २०१९-२० | ६७/२.२२१ | २/०.०९९ | ५०/२.७५ | १२०/५.०६ |
| ३ | २०१९-२० | २०२०-२१ | ३८/१.२५४ | १३/०.४२९ | ४४/२.४२ | ९५/४.१०३ |
| ४ | -- | २०२०-२१ | ६७ | ९ | ५० | ६.२२६ |
| ५ | २०२०-२१ | २०२१-२२ | - | - | - | - |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८.

## क्रीडा विभाग

**<u>महानगरपालिका परिसरातील विद्यार्थी खेळाडूंसाठी शालेय शिष्यवृत्ती योजना</u>**

मा. महापालिका सभा ठराव क्र.९९१, दि.२०/०९/२०१० चे अधिन राहून, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी खेळाडूंना प्रोस्ताहन मिळून म.न.पा. परिसरातील जास्तीत जास्त राज्य व राष्ट्रीय स्तरावर तयार होण्याच्या दृष्टीने म.न.पा.च्या वतीने दरवर्षी दिल्या जाणा-या क्रीडा शिष्यवृत्ती रक्कमेत वाढ करणे आवश्यक असल्याने सन २००९-१० वर्षापासून महाराष्ट्र शासन, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचेतर्फे आयोजित राज्यस्तरीय शालेय स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंस वार्षिक र.रू.१८,००/- ऐवजी र.रू.३,०००/- तसेच असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी तर्फे आयोजित आंतरविद्यापिठ (राष्ट्रीय) स्तरावर सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंस वार्षिक र.रू.१८,००/- ऐवजी र.रू.३,०००/- राष्ट्रीयस्तर शालेय क्रीडा स्पर्धा (नॅशनल स्कुल गेम/स्कुल गेम फेरडेशन ऑफ इंडिया) तर्फे आयोजित राष्ट्रीय शालेय स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंस वार्षिक र.रू.३,०००/- ऐवजी र.रू.५,०००/- या प्रमाणे क्रीडा शिष्यवृत्ती अदा करणेस मान्यता दिलेली आहे.

**क्रीडा शिष्यवृत्ती अदा करणे कामी मा.आयुक्त यांचे कडील आदेशक्र.क्रीडा/३/कावि/४३/२०१०, दि.१०/०२/२०१० नुसार निश्चित केलेल्या धोरणातील अटी व शर्ती पुढील प्रमाणे**

१) क्रीडा शिष्यवृत्ती ही पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रहिवासी विद्यार्थी खेळाडूंसाठी देण्यात येईल. त्यासाठी पुरावा म्हणून आवश्यक कागदपत्रे, (उदा.रेशनिंग कार्डची सत्यप्रत) सादर करणे आवश्यक आहे. विद्यार्थी खेळाडू हा महापालिका हद्दीतील रहिवासी असेल व शिक्षणासाठी हद्दीबाहेरील शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेत असल्यास तो क्रीडा शिष्यवृत्तीसाठी पात्र राहील.

२) **मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावी/४९०/२०१८ दि.२०/४/२०१८ अन्वये सन २०१८-१९ पासून महाराष्ट्र शासन, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचे तर्फे आयोजित राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूस वार्षिक र.रू.३,३००/- तसेच असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी तर्फे आयोजित आंतरविद्यापीठ (राष्ट्रीय)**

**स्तरावर सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंस वार्षिक र.रू.३,३००/- व राष्ट्रीय शालेय स्पर्धा (नॅशनल स्कूल गेम/स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया) तर्फे आयोजित राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूस वार्षिक र.रू.५,५००/- क्रीडा शिष्यवृत्ती देणेस मान्यता देणेत आलेली आहे.**

३) अ.क्र.२ मध्ये नमुद केल्या व्यतिरिक्त अन्य स्पर्धांमध्ये उदा.क्रीडा मंडळे, संस्था, निमशासकीय संस्था यांनी आयोजित केलेल्या स्पर्धामधील प्रमाणपत्रे क्रीडा शिष्यवृत्तीसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

४) क्रीडा शिष्यवृत्ती ही ज्या वर्षी प्राविण्य मिळविले आहे, त्या वर्षापुरतीच मर्यादित राहील. ती कायम स्वरूपाची देय राहणार नाही.

५) क्रीडा शिष्यवृत्ती मिळणेकामी दिलेल्या मुदतीत विहित नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

६) अपुर्ण माहिती भरलेल्या अर्ज तसेच संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे मार्फत न पाठविलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

७) फक्त गतवर्षीची क्रीडा शिष्यवृत्ती चालू वर्षात अदा केली जाईल.

८) क्रीडा शिष्यवृत्ती नापास (अनुत्तीर्ण) विद्यार्थी खेळाडूंस देण्यात येणार नाही. सदर विद्यार्थी खेळाडू हा गतवर्षी उत्तीर्ण झालेला असावा.

९) क्रीडा शिष्यवृत्ती मिळणेकामी विद्यार्थी खेळाडूने महापालिका क्षेत्रात रहिवासी असलेचा पुरावा गतवर्षीच्या खेळाचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र व गतवर्षी उत्तीर्ण झालेचे प्रमाणपत्र (मार्कलिस्ट)विहित नमुन्यातील अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

१०) अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची आढळल्यास क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात येणार नाही.

११) क्रीडा शिष्यवृत्ती अदा केली असल्यास ती वसुल केली जाईल.

१२) क्रीडा शिष्यवृत्तीचा वापर क्रीडा विकासासाठी करणे आवश्यक आहे.

१३) क्रीडा शिष्यवृत्ती मिळणेबाबत विद्यार्थी खेळाडूंस हक्क सांगता येणार नाही.

१४) विद्यार्थी खेळाडू हा महापालिका हद्दीबाहेर राहत असल्यास क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात येणार नाही.

१५) विद्यार्थी खेळाडू हा गतवर्षी उत्तीर्ण झालेला असावा. तसेच तो चालू वर्षात शिक्षण घेत असावा.

१६) क्रीडा शिष्यवृत्ती अर्ज हे विद्यार्थ्यांना मोफत देण्यात येतील.

१७) क्रीडा शिष्यवृत्ती अर्जाचे वाटप व स्विकृती दि. १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट (सार्वजिक सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत करण्यात येईल. तथापी यामध्ये बदल करण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना राहील.

१८)विविध खेळात प्राविण्य मिळविले तरी क्रीडा शिष्यवृत्ती एकदाच देय राहील.

१९) क्रीडा शिष्यवृत्ती मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना राहील.

२०) क्रीडा शिष्यवृत्तीच्या धोरण, नियम व अटीमध्ये बदल करण्याचा अथवा वाढ किंवा घट करण्याचा अथवा शिथिल करण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना राहील.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८**
**क्रीडा विभाग**
**क्रीडा शिष्यवृत्ती मिळणे बाबत अर्ज २०२२ – २०२३**

प्रति,
मा. आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.

**विषय - क्रीडा शिष्यवृत्ती मिळणे बाबत अर्ज....**

महोदय,

मी विनंती अर्ज करतो / करते की मी गत वर्षी सन **२०२१-२२** मध्ये -----------या खेळात १) महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक संचालनालय यांचे तर्फे आयोजित राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत २) असोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्ससिटी तर्फे आयोजित स्पर्धेत ३) राष्ट्रीय शालेय स्पर्धात (नॅशनल स्कूल गेम/स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया) तर्फे आयोजित राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी / विजयी झालो / झाले असून ------------- क्रमांक मिळविलेला आहे. क्रीडा शिष्यवृत्ती संदर्भात असलेले सर्व नियम व अटी मी वाचल्या असून ते मला मान्य आहे. तरी मला म.न.पा. नियमानुसार क्रीडा शिष्यवृत्ती मिळावी ही विनंती.

माझी माहिती खालील प्रमाणे...

१. विद्यार्थी / खेळाडूचे पूर्ण नाव - ---------------- -----------------------------------

२. संपूर्ण कायमचा पत्ता - ----------------------------------------------------
----------------------------------------------------

३. फोन नंबर - ----------------------------------------------------

४. जन्म तारिख - ----------------------------------------------------

५. ई – मेल - ----------------------------------------------------

६. गतवर्षी शिक्षण घेतलेल्या संस्थेचे नाव - ------------------------------------------------------- ------- --------------- इयत्ता - ---------------------- सन - -------

७. चालू वर्षी शिक्षण घेत असलेल्या संस्थेचे नाव -------------------------------------------------------- ------------------- इयत्ता - -------------------- सन- -------

८. गतवर्षी उत्तीर्ण झाला आहात काय ? ---------------------------------------------- (सोबत मार्कलिस्ट जोडावी)

९. कोणत्या पातळीवर प्राविण्य मिळवलेले आहे ------------------------------------------ त्याचा तपशिल

१०. अर्जदारास इतर संस्थाकडून क्रीडा शिष्यवृत्ती ------------------------------------------ मिळत असलेस त्याचा तपशिल

अ) संस्थेचे नाव ----------------------------------------------

ब) शिष्यवृत्ती र.रू ------------------------------------------------

क) शिष्यवृत्तीचा कालावधी ------------------------------------------------

११. वडिलांचे /पालकांचे पुर्ण नाव व पत्ता ------------------------------------------------
-----------------------------------------------
-----------------------------------------------

१२. वडिलांचे /पालकांचे वार्षिक उत्पन्न -----------------------------------------------

उपरोक्त अर्जात दिलेली सर्व माहिती ही सत्य असून मला क्रीडा शिष्यवृत्ती मिळणेस विनंती आहे.

सोबत - १) खेळाचे प्रमाणपत्र (दोन प्रतीत)
२) गतवर्षीचे मार्कलिस्ट
३) रेशनिंग कार्डची झेरॉक्स प्रत
४) आधारकार्डची झेरॉक्स प्रत
५) पॅन कार्ड झेरॉक्स प्रत

दिनांक -

विद्यार्थी / खेळाडूची सही

नाव - -----------------------------------

**प्रमाणपत्र**

**मुख्याध्यापक / प्राचार्य**

कुमार / कुमारी ---------------------------------------------------------------------यांनी उपरोक्त अर्जात दिलेली माहिती सत्य असून त्यांची वर्तणूक चांगली आहे.

सदर विद्यार्थी / खेळाडू हा गतवर्षी सन ----------------------------- मध्ये इयत्ता -------------------- मध्ये शिक्षण घेत होता / होती हा विद्यार्थी / खेळाडू गतवर्षी उत्तीर्ण झाला / झाली असून चालू वर्षात आमच्या संस्थेत इयत्ता ------------------------- मध्ये शिक्षण घेत आहे. हा खेळाडू गतवर्षी --------------------------- या खेळात ---------------------------------------या स्तरावर शालेय / महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत सहभागी / प्राविण्य मिळवून ---------------क्रमांक मिळविला आहे.

सदर विद्यार्थी / खेळाडूस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा शिष्यवृत्ती योजनेत प्रवेश देण्यास शिफारस करण्यात येत आहे.

ठिकाण -

दिनांक - सही/ शिक्का

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८**
**क्रीडा विभाग**
**खेळाडू दत्तक योजना - प्रवेश अर्ज २०२२ – २०२३**

प्रति,
मा. आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.

**विषय -** खेळाडू दत्तक योजना अंतर्गत प्रवेश मिळणे बाबत....

महोदय,

मी विनंती अर्ज करतो / करते की मी गत वर्षी सन **२०२२-२२** मध्ये -----------या खेळात राज्य / राष्ट्रीय / आंतर विद्यापिठ स्तरावर शालेय / महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत सहभागी / विजयी झालो / झाले असून ------------- क्रमांक मिळविलेला आहे. खेळाडू दत्तक योजना संदर्भात असलेले सर्व नियम व अटी मी वाचल्या असून ते मला मान्य आहे. तरी मला म.न.पा. नियमानुसार खेळाडू दत्तक योजनेचा लाभ मिळावा ही विनंती.

माझी माहिती खालील प्रमाणे...

१. विद्यार्थी / खेळाडूचे पूर्ण नाव - ---------------- -----------------------------------

२. संपूर्ण कायमचा पत्ता - ----------------------------------------------------
----------------------------------------------------

३. फोन नंबर - ----------------------------------------------------

४. जन्म तारिख - ----------------------------------------------------

५. खेळाचे नाव व प्रकार - ----------------------------------------------------

६. खेळात मिळविलेले प्राविण्य / सहभाग़ - -----------------------------------------

७. कोणत्या पातळीवर प्राविण्य मिळवलेले आहे त्याचा तपशिल -------------- खेळ ------------------------
--- सन --------------------- सहभाग / प्राविण्य ----------------

८. गतवर्षी शिक्षण घेतलेल्या संस्थेचे नाव - ------------------------------------------------------ -------
-------------- इयत्ता - ---------------------- सन - --------

९. चालू वर्षी शिक्षण घेत असलेल्या संस्थेचे नाव ------------------------------------------------------
------------------- इयत्ता - ----------------------- सन - ----

१०. म.न.पा. कडून खालील खेळापैकी कोणत्या खेळासाठी सुविधा उपलब्ध करुन पाहिजे आहे -----------
-------------------------------------------------------------------

१. खो खो, २. क्रिकेट, ३. रायफल शुटींग, ४. बॉक्सिंग, ५. जलतरण,
६. हॉकी, ७. मैदानी खेळ (ॲथलेटिक्स), ८. बॅडमिंटन, ९. कबड्डी. १०. कुस्ती.
११ रोलर स्केटींग

११. खेळाडू दत्तक योजने अंतर्गत आपणास म.न.पा. कडून काय सुविधा पाहिजे त्याचा तपशील -------
------------------------------------------------------------------

१२. खेळाडूस येण्याजाण्यासाठीचा बसमार्ग तपशिल ----------------------------------

१३. आधारकार्ड क्रमांक - -----------------------------------------------------------

सोबत - १) खेळाचे प्रमाणपत्र (दोन प्रतीत)
२) गतवर्षीचे मार्कलिस्ट
३) रेशनिंग कार्डची झेरॉक्स प्रत
४) आधारकार्डची झेरॉक्स प्रत
५) पॅन कार्ड झेरॉक्स प्रत

दिनांक -

विद्यार्थी / खेळाडूची सही

नाव - ---------------------------------

**प्रमाणपत्र**

**मुख्याध्यापक / प्राचार्य**

कुमार / कुमारी ------------------------------------------------------------------यांनी उपरोक्त अर्जात दिलेली माहिती सत्य असून त्यांची वर्तणूक चांगली आहे.

सदर विद्यार्थी / खेळाडू हा गतवर्षी सन ----------------------------- मध्ये इयत्ता -------------------- मध्ये शिक्षण घेत होता / होती हा विद्यार्थी / खेळाडू गतवर्षी उत्तीर्ण झाला / झाली असून चालू वर्षात आमच्या संस्थेत इयत्ता ------------------------- मध्ये शिक्षण घेत आहे. हा खेळाडू गतवर्षी --------------------------- या खेळात ---------------------------------------या स्तरावर शालेय / महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत सहभागी / प्राविण्य मिळवून ---------------क्रमांक मिळविला आहे.

सदर विद्यार्थी / खेळाडूस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या खेळाडू दत्तक योजनेत प्रवेश देण्यास शिफारस करण्यात येत आहे.

ठिकाण -

दिनांक -

सही/ शिक्का

मुख्याध्यापक / प्राचार्य